**म.सं.कौ.हि.का.अर्ज ३६/२०२४**

**निशाणी क्र.२१**

**<u>अर्जदाराचा जादा सरतपास अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री.आर.आर.सरडे पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

**१०.** मी निशाणी ३/१ येथे माझी व सामनेवाला क्र.१ ची लग्नपत्रिका व निशाणी ३/२ येथे सामनेवाला क्र.१ व माझा लग्नातील फोटो दाखल केला आहे.(सामनेवालांतर्फे विधीज्ञ यांना ही कागदपत्रे मान्य असल्याने त्यांना **<u>निशाणी २७ व २८</u>** देण्यात येते.) मी निशाणी १९/१ व २ येथे खाते क्र.२७३७ व १८५० चे उतारे, निशाणी १९/३ ते १९/५ येथे ७/१२ उतारे दाखल केले आहेत.(सदरची कागदपत्रे ही भारतीय पुरावा कायदा कलम ७४ नुसार सार्वजनिक दस्तऐवज असुन त्याच्या सहीसूद प्रती दाखल असल्याने त्याच कायद्याच्या कलम ७७ नुसार त्यांना निशाणी २९ ते ३३ देण्यात येते.)

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>सामनेवाला क्र.१ ते ३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.बी.घोगरे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु–</u>**

**११.** हे खरे की, सामनेवाला क्र.५ ही माझी नणंद आहे. हे खरे की, ती तिच्या पतीसोबत तुळजापूर तालुक्यात राहते. हे खरे की, मी व माझ्या घरच्यांविरुद्ध सामनेवाला यांनी भिगवण पोलिस ठाणेत गु.र.नं.२५०/२०२४ दाखल केला होता. हे खरे की, माझ्या वडिलांची परिस्थिती हलाखीची आहे. आमच्या समाजात मुलाकडून मुलीला हुंडा दिला जातो अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, सामनेवाला क्र.१ याने माझ्या आई–वडिलांना पैसे दिले होते. हे खरे की, माझ्या वडिलांनी सामनेवाला यांना लग्नात रक्कम रु.२,२०,०००/– दिले असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

**१२.** हे खरे की, सामनेवाला क्र.१ च्या गावी माझे लग्न झाले. हे खरे नाही की, त्या लग्नाचा खर्च सामनेवाला क्र.२ व ३ यांनी केला. माझे शिक्षण १२वी झाले आहे. सामनेवाला क्र.१ हा पदवीधर आहे. मी सामनेवाला क्र.१ सोबत सहा महिने राहिले आहे. हे खरे नाही की, त्या सहा

महिन्याच्या काळात मला सामनेवाला क्र.१ ने व्यवस्थित नांदविले. माझी नांदण्याची इच्छा होती. मला नवऱ्याने नांदवायला न्यावे म्हणून न्यायालयात कोणतीही कारवाई केली नाही.

**१३.** हे खरे नाही की, मी लग्नानंतर सासरच्या कोणासोबत बोलायचे नाही व माझ्या मनाविरुद्ध लग्न झाले असे म्हणून कोणतेही काम करायचे नाही. हे खरे नाही की, मला सासरी करमत नसल्याने माझा नवरा मला आठवड्यातून २ ते ३ वेळा बाहेर फिरायला घेऊन जायचा. हे खरे नाही की, माझा नवरा मला जवळ घ्यायचा प्रयत्न करायचा तेव्हा मी त्याला आत्महत्या करण्याची धमकी द्यायचे. हे खरे नाही की, त्यामुळे माझ्या नवऱ्याने माझ्या आई–वडिलांकडे तक्रार केली. हे खरे नाही की, त्यावेळी मी माझ्या नवऱ्याला म्हणाले की, माझ्या आई–वडिलांनी पैशासाठी लग्न करुन दिले आहे. त्यामुळे तुम्ही तक्रार करु नका.

**१४.** मी नातेवाईकांमार्फत माझ्या नवऱ्याच्या घरी जाऊन त्याला समजावण्याचा प्रयत्न केला होता. मी माझ्या चुलत्याला घेऊन गेले होते. हे खरे की, मी नातेवाईकांना घेऊन माझ्या नवऱ्याच्या घरी गेले नाही. मी व माझे चुलते माझ्या सासरी कधी गेलो ते मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, आम्ही गेलोच नसल्याने आम्ही कधी गेलो ते सांगता येत नाही. हे खरे नाही की, माझे सासू–सासरे हे वारकरी पंथातील असुन दिंडीला जातात. हे खरे नाही की, माझे सासू–सासरे दिंडीला गेले असताना व माझा नवरा घरी नसताना मी परस्पर माहेरी गेले. मी दि.०३/०७/२०२४ रोजी माहेरी आले. हे खरे नाही की, त्यानंतर माझ्या सासरचे लोक मला न्यायला आले होते. हे खरे नाही की, त्यानंतर आम्ही भिगवण पोलिस ठाणेत भांडण मिटवायला गेलो. हे खरे नाही की,मी तेथुन नांदायला न जाता आम्ही माझ्या नवऱ्याला मारहाण केली. हे खरे नाही की, आम्ही त्याला धमकी दिली की, तुझ्यावर ४९८ ची केस करतो. दि.२४/०७/२०२४ रोजी मी ४९८ ची केस केली. ती केस मी संध्याकाळी केली. माझ्या पतीने माझ्याविरुद्ध दि.२४/०७/२०२४ रोजी दुपारी केस केली अगर कसे मला माहिती नाही.

**१५.** हे खरे की, माझ्या नवऱ्याकडे कामधंदा नसुन तो मजुरी करतो. हे खरे की, माझ्या सासऱ्यांच्या नावचे जे उतारे दाखल केले त्या सर्व जिरायती जमीनी आहेत. हे खरे नाही की, सामनेवाला क्र.१ व २ यांना मोलमजुरीशिवाय उत्पन्नाचे साधन नाही. हे खरे की, माझ्या नवऱ्याकडे

ट्रॅक्टर असल्याबाबत मी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. हे खरे की, त्याला शेतीतून २ लाखाचे उत्पन्न मिळते असे दाखविणारा पुरावा मी दिलेला नाही. माझी नांदायला जायची इच्छा नाही. हे खरे नाही की, मी स्वतःहून माझ्या सासरचा त्याग केला आहे. हे खरे नाही की, मला नांदायची इच्छा नसल्याने मला पैसे मिळणाऱ्या केसेस मी दाखल केल्या. हे खरे नाही की, मी मशीन काम करते. हे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर व मागण्या खोट्या आहेत.

**सामनेवाला क्र.१ ते ३ तर्फे उलटतपास पूर्ण.**

**सामनेवाला क्र.४ व ५ गैरहजर असल्याने त्यांच्याविरुद्ध उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.11.19 18:59:58 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

**दि.१९/११/२०२५** **(प्राजक्ता राजीव सबनीस),**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**

**ता.इंदापूर, जि.पुणे.**